महाराष्ट्र शासन

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४१९
ई-मेल-desk17@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

**परिपत्रक :**

क्रमांक : १७/तंशिसं/परदेशी शिष्यवृत्ती/२०२२/११५ दिनांक : 05 AUG 2022

**विषय : उच्च व तंत्रशिक्षण विभागांतर्गत खुल्या प्रवर्गातील "गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती" या योजनेअंतर्गत सन २०२२-२३ करिता शिष्यवृत्ती निवडीसाठी अर्ज स्विकृतीच्या मुदत वाढीबाबत...**

**संदर्भ** : १) शासन पत्र उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक पशियो-२०२२ /प्र.क्र.१०८/तांशि-४, दि.३ जून, २०२२

२) संचालनालयाचे पत्र क्र. १७/तंशिसं/परदेशी शिष्यवृत्ती/२०२२/१०६, दिनांक २२ जुलै, २०२२

शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र. संकीर्ण-२०१८/प्रक्र.२१८/तांशि-४, दिनांक ०४ ऑक्टोबर, २०१८ च्या शासन निर्णयान्वये उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत खुल्या प्रवर्गातील "गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती" योजना जाहीर करण्यात आलेली असून, शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र. संकीर्ण-२०२०/प्रक्र.११६/तांशि-४, दिनांक ६ सप्टेंबर, २०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये सदरची योजना काही सुधारणांसह राबविण्यांत येते.

त्याअनुषंगाने संदर्भाधिन क्र. १ च्या दि. ३ जून, २०२२ रोजीच्या शासन पत्रान्वये सदरची योजना शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये राबविण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे.

संदर्भाधिन क्र. २ च्या दिनांक २२ जुलै, २०२२ च्या पत्रान्वये सदरची मुदत वाढवून उमेदवारांनी online पद्धतीने अर्ज करण्याची मुदत दिनांक ५ ऑगस्ट, २०२२ अशी करण्यांत आली होती तसेच online भरलेल्या अर्जाची प्रत व आवश्यक प्रमाणपत्रे व कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती संबंधित विभागीय कार्यालयास मूळ कागदपत्रांवरुन पडताळणी करुन सादर करण्याची मुदत दिनांक ८ ऑगस्ट, २०२२ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत करण्यांत आलेली होती.

सदरची मुदत वाढवून आता उमेदवारांनी online पद्धतीने अर्ज करण्याची मुदत **दिनांक २२ ऑगस्ट, २०२२** अशी करण्यांत येत आहे. तसेच online भरलेल्या अर्जाची प्रत व आवश्यक प्रमाणपत्रे व कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती संबंधित विभागीय कार्यालयास मूळ कागदपत्रांवरुन पडताळणी करुन सादर करण्याची मुदत **दिनांक २३ ऑगस्ट, २०२२** सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत करण्यांत येत आहे.

(डॉ. अभय वाघ)
संचालक, तंत्र शिक्षण,
म.रा., मुंबई

प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी :

१) संचालक, उच्च शिक्षण पुणे
२) सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर
३) सहसंचालक, उच्च शिक्षण, मुंबई/पुणे/जळगांव/नांदेड/पनवेल/कोल्हापूर/सोलापूर/नागपूर/ औरंगाबाद/ अमरावती